
HISTORICITY RESEARCH JOURNAL

# उत्तर सोलापूर तालुक्यातील प्राथमिक शिक्षिकांच्या 'स्व' संकल्पना व व्यावसायिक समाधानाचा अभ्यास

डॉ. एस. एस राऊत[१] , श्री. डी. आय. गायकवाड[२] , श्रीमती. एस. डी. विधाते[३]
[१]सी. बी. खेडगी महाविदयालय , अक्कलकोट .
[२]सी. बी. खेडगी महाविदयालय , अक्कलकोट .
[३]विषय साधन व्यक्ती , उत्तर सोलापूर पंचायत समिती.



**सारांश :-**

भारतीय स्त्री प्राचीन काळापासून शिक्षण घेण्यात व त्याचा प्रसार करण्यात अग्रेसर आहे. शिक्षणामुळे स्त्रीयांच्या कार्यशक्तीला वाव मिळाला आहे. इतिहासातील गार्गी, मैत्रयी सुलभा या विदुषी महिलांनी शिक्षण, राजकारण, तत्वज्ञान इ. क्षेत्रातील वर्चस्व कायम राखलेले दिसून येते. स्वातंत्र्यपूर्वकाळात व स्वातंत्र्यानंतर समाज सुधारकांनी स्त्री उध्दाराची सुरवात स्त्रीयांच्या शिक्षणापासून केली होती. या पार्श्वभूमीवर सदर संशोधन पेपरचा प्रमुख हेतू असा आहे कि, प्राथमिक शिक्षकामधील स्व संकल्पनाची निश्चिती करणे व याच शिक्षिकामधील व्यावसायिक समाधानाचा शोध घेणे. यासाठी संशोधकाने डॉ. वि. के. मित्तल यांची 'स्व' संकल्पना प्रश्लावली व डॉ. अमरसिंग व डॉ. टी. आर. शर्मा यांची व्यावसायिक समाधान श्रेणी याचा वापर केला आहे. सदर चाचणी गुगल फार्मद्वारे भरून घेण्यात आलेली असून नंतर त्याचे सांख्यिकी विश्लेषण करण्यात आलेले आहे. सदर संशोधनाद्वारे असे कळते कि, प्राथमिक शिक्षिकामध्ये 'स्व' संकल्पना अस्तित्वात आहे व मोठया प्रमाणात त्या त्याच्या व्यावसाया संदर्भात समाधानी आहेत.

**प्रस्तावना :-**

प्राथमिक शिक्षण हा शिक्षण व्यवस्थेचा पाया असून खऱ्या अर्थाने बालक येथूनच अध्ययनास सुरवात करतो. प्राथमिक शिक्षण देण्यासाठी शासन स्तरावर १ ते ५ व ६ ते ८ असे विभाग करण्यात आलेले आहेत. या दोन्ही स्तरावर मोठया प्रमाणात शिक्षिका कार्य करताना आढळून येतात. या सर्व शिक्षिका केवळ पर्याय म्हणून हा व्यावसाय स्विकारलेला नसून उदयाचे भावी नागरिक घडविण्यासाठी मनापासून प्रयन्त करत आहेत. विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्त्रीयांपेक्षा 'शिक्षिका 'या व्यावसायात संख्या जास्त आहे. विविध व्यावसायिक क्षेत्रात उच्च शिक्षण घेऊन महिलांनी स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा परिचय करून दिला आहे. प्रगत समाजामध्ये आपण ही समाज परिवर्तनाचा, कौटुंबिक प्रगतीचा व प्रतिष्ठेचा घटक आहोत. हे कतृत्वाने दाखवून दिले आहे. याद्वारेच महिला आपला 'स्व' जागृत ठेऊन सामाजिक, व्यवसायिक, शैक्षणिक व राजकिय क्षेत्रातील सक्षमतेची जाणीव करून दिली आहे.

शैक्षणिक क्षेत्रात प्रामुख्याने महिलांच्या कार्याचा मोठा वाटा आहे. शिक्षणासाठी प्रयत्न करणाऱ्या महिलामध्ये सावित्रीबाई फुले, ताराबाई मोडक, अनुताई वाघ यांची नावे प्रातिनिधिक स्वरूपात सांगता येतील. म. फुले, म. गांधी, डॉ. आंबेडकर, रविंद्रनाथ टागोर व डॉ. राधाकृष्णन यांना स्त्रियांच्या कार्यशक्तीला वाव मिळेल, तिला विकासाचे स्वातंत्र्य मिळेल अशी त्यांची अपेक्षा होती. यामधूनच स्त्रीया या समाजाचा एक जबाबदारघटक म्हणून तिच्यावरही काही जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या जेणेकरून सुदृढ समाज निर्माण होईल. देशाचा विकास घडवून आणावयाचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. शिक्षणाला प्राथमिक स्तरावर बळकटी देण्यासाठी स्त्रीयांचा मोठा वाटा आहे. या सर्व महिला शिक्षकामध्ये त्याच्या स्व संकल्पनाची व व्यावयायिक समाधानाची पातळी काय आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

**उद्दिष्टये :-**

१) उत्तर सोलापूर तालुक्यातील महिला शिक्षिकांच्या 'स्व' संकल्पनाची निश्चिती करणे.

२) उत्तर सोलापूर तालुक्यातील महिला शिक्षिकांच्या व्यावसायिक समाधानाचा शोध घेणे.

**संशोधन पध्दती:-**

सदर संशोधनासाठी प्राथमिक माहितीचा वापर करण्यात आला आहे. हि प्राथमिक माहिती प्रमाणित चाचण्या देऊन संकलित करण्यात आली आहे. डॉ. वि. के. मित्तल यांची 'स्व' संकल्पना प्रश्नावली व डॉ. अमरसिंग व डॉ. टी. आर. शर्मा यांची व्यावसायिक समाधान श्रेणी हे माहिती संकलनाचे प्रमुख साधने आहेत. उत्तर सोलापूर तालुक्यातील एकुण १०२१ महिला प्राथमिक शिक्षिकामधून १४५ शिक्षिकाची यादृच्छिक न्यादर्श निवड पध्दतीने करण्यात आलेली आहे. संकलित माहितीचे विश्लेषण व सादरीकरण करण्यासाठी सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे. माहितीला अधिक विस्तृतपणे अर्थप्राप्ती होणेसाठी सांख्यिकी पध्दती वापरण्यात आली आहे.

**स्व संकल्पना:-**

मनुष्य हा नेहमीच समाजप्रिय प्राणी राहिला आहे. एकटा व्यक्ती स्वत:चे जीवन योग्य पध्दतीने जगू शकत नाही. समाजामध्ये वावरत असताना व्यक्ती एकमेकांशी सामजस्याने राहून प्रगती साधण्याचा प्रयत्न करतो. प्रगती योग्य मार्गाने व दिशेने होण्यासाठी स्वत:मध्ये सातत्याने बदल घडवत असतो. या सर्व प्रक्रियेत तो स्वत:ची 'स्व' संकल्पना जतन करतो. 'स्व' संकल्पना म्हणजे स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव आणि इतर व्यक्तीच्या भावना, विश्वास, कल्पना यांची जाणीव करून घेणे म्हणजे 'स्व' संकल्पना होय.

मानसशास्त्रीय दृष्टया 'स्व' संकल्पना हा व्यक्तिमत्व विकासाचा महत्वपूर्ण घटक आहे. सकारात्मक 'स्व' संकल्पना जीवन सुखी करते तर नकारात्मक 'स्व' संकल्पना विकसित झाल्यास जीवन दु:खी होते. त्यामुळे प्रथमत: महिला शिक्षिकांनी सकारात्मक दृष्टीने जीवनाकडे पाहणे अपेक्षित आहे. विदयार्थ्यांना संरक्षण, मानसिक आधार, प्रोत्साहन व विविध अनुभव देऊन त्याची निर्णयक्षमता वाढविली पाहिजे. तसेच मुलीमध्ये हा सकारात्मक विचार योग्य पध्दतीने रूजल्यास त्याचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलून जाईल व एक नविन आशावादी दृष्टिकोन बदलून जाईल व एक नवीन आशावादी दृष्टि विकसित होईल.

**कोष्टक क्र. १.१ महिला शिक्षिकांचा 'स्व' संकल्पना स्तर**

| अ.क्र. | स्तर | शिक्षिकांची संख्या |
|---|---|---|
| १ | उष्कृष्ट | १२ (८.२७) |
| २ | चांगला | १४ (९.६५) |
| ३ | समाधानकारक | ६३ (४३.४५) |
| ४ | निम्न | ५० (३४.४८) |
| ५ | अतिनिम्न | ६ (४.१४) |

**स्त्रोत :- संशोधकाचे सर्वेक्षण**

कोष्टक क्र. १.१ असे दर्शविते कि, प्राथमिक महिला शिक्षिकांमध्ये 'स्व' संकल्पना हि भावना कमी जास्त प्रमाणात अस्तित्वात आहे. उत्कृष्ठ 'स्व' संकल्पना असणाऱ्या महिला शिक्षिकांची संख्या एकूण नमुना महिला शिक्षिकांपैकी केवळ १२ एवढी आहे. त्याचे एकूण संख्येपैकी प्रमाण हे ८.२७ टक्के आहे. महिलांनी जरी राजकारण, वैदयक क्षेत्र, अंतराळ इत्यादी क्षेत्रात आपला ठसा उमटविला असला तरी सर्वच महिलांमध्ये 'स्व' संकल्पना जागृत असेलच असे ठाम वक्तव्य करता येत नाही. महिला शिक्षिकांमध्ये उत्कृष्ठ स्तरावरील 'स्व' संकल्पना कमी असण्याचे कारण सामाजिक भेद असू शकते. तरीही सर्वसाधारणपणे एकूण नमुनाच्या ५.५२ टक्केहे प्रमाण लक्षाणीय ठरते.

चांगली 'स्व' संकल्पना या गटात १४ महिला शिक्षिकांचे समावेश होतो. हे प्रमाण शेकडेवारीनुसार ९.६५ टक्के इतके आहे. 'स्व' संकल्पना हि 'स्व' प्रेरणा, 'स्व' ओळख, 'स्व' प्रतिमा इत्यादीवर आधारित असते. याचाच अर्थ असा होतो की १४ महिला शिक्षिकां मध्ये वरिल गुण चांगल्या पध्दतीने रूजलेले आहेत. ते स्वत:चे अस्तित्व ओळखून कार्य करतात.

समाधानकरक 'स्व' संकल्पना हा सर्व पाच गटाच्या विभागणीचा मध्य आहे. अपेक्षेप्रमाणे महिला शिक्षिकांचे प्रमाण येथे सर्वात जास्त म्हणजे ६३ इतके असून त्याची टक्केवारी ४३.४४ इतकी दर्शविते. महिला शिक्षकाचा विचार करता ते समाधानकारकरित्या 'स्व' संकल्पना सिध्द करताना दिसून येतात.

निम्न व अतिनिम्न 'स्व' संकल्पना गटात एकूण ५६ महिला शिक्षिकांचा समावेश होताना दिसून येता. हे प्रमाण एकूण नमूना शिक्षिकेच्या ३८.६१ टक्के एवढे आहे. 'स्व' संकल्पना शिक्षिकांमध्ये कमी असणे अपेक्षितच नाही. कारण स्वत:च्या अस्तित्वाच्या माध्यमातूनच व्यक्तीचा योग्य विकास होत असतो. तरीही आजपर्यंत 'स्व' संकल्पना कमी दर्जाची असण्यापाठीमागे निश्चित कारणे सांगता येतील. जसे समाजात, व्यावसायात स्वतंत्र्यरित्या स्त्रीयांना स्थान प्राप्त करण्यास प्रेरणा मिळत नव्हती. स्त्रीयांच्या सक्षमीकरणातून महिलांना 'स्व' ची जाणीव होताना दिसत आहे. परंतु त्याचा वेग मात्र कमी असल्याचे जाणवते.

**व्यावसायिक समाधान :-**

व्यक्ती स्वतःच्या गरजा पूर्ण करणेसाठी व्यावसाय करतो परंतु व्यावसायिक समाधान हि व्यक्तीची मानसिक पातळीवर जाणविणारी मानसिक स्थिती आहे. सभोवतालच्या परिस्थितीतून चांगल्या प्रकारच्या व्यावसायिक ज्ञानाची प्राप्ती करून घेऊन संपूर्ण कार्यक्षमतेने प्रभावी व परिणामकारक व्यावसाय करण्याचा आनंद देणारी निष्ठापूर्वक वृत्ती म्हणजे व्यावसाय समाधान होय. महिलांच्या व्यावसाय समाधानावर त्याची क्षमता व प्रशिक्षण याचा प्रभाव पडतो. व्यावसायात महिलांना पुष्कळवेळा, किंबहुना रोजच पुरूष सहकाऱ्यांशी स्पर्धा करावी लागते. एकीकडे नोकरी व दुसरीकडे संसार या दुहेरी भूमिकेतून महिलांची द्विधा मनस्थिती होते.

व्यावसायिक समाधान अंतरिक आणि बाहय घटकावर अवलंबून असते. आंतरिक घटक हे आत्मप्रतिष्ठा स्वतःची प्रगती, अविष्कार, काम आणि कार्य क्षेत्राशी एकरूप होणे यांच्याशी संबंधित आहे. पगारात वाढ होणे, पुरस्कार प्राप्ती, व्यवसायिक विकासाच्या संधी इ. बाहय घटकात समावेश होतात.

**कोष्टक क्र. १.२ व्यावसायिक पातळी**

| अ.क्र. | स्तर | शिक्षिकांची संख्या |
|---|---|---|
| १ | सर्वोष्कृष्ट | १३८ (९५.१७) |
| २ | अति समाधानकारक | ६ ( ४.४४) |
| ३ | समाधानकारक | १ (०.६९) |
| ४ | निम्न समाधानकारक | ० (०.००) |
| ५ | अति निम्न समाधानकारक | ० (०.००) |

कोष्टक क्र.१.२ महिला शिक्षिकाची व्यावसायिक समाधान पातळी दर्शविण्यात आली आहे. सदर कोष्टकानुसार निदर्शनास येते की, शिक्षिकांची समाधान पातळी समाधानकारकतेच्या पुढे अतिसमाधानकारक व सर्वोष्कृष्ट याच गटात समाविष्ट होत आहे. समाधान पातळी निम्न किंवा अतिनिम्न गटामध्ये नोंदविलेली नाही.

समाधानकारक या गटामध्ये केवळ १ महिला शिक्षिकाचा प्रतिसाद दिलेला आहे. त्याचे प्रतिशत प्रमाण ०.६८ इतके आहे. अतिसामाधानकारक गटात ६ महिला शिक्षिका येत असून त्याचे प्रमाण एकूण नमुनाच्या ४.१३ टक्केएवढे आहे. या दोन्ही गटामध्ये शिक्षिकांचे मत नोंदविण्याचे कारण सुरवातीच्या काळात शिक्षण सेवक योजनेत समावेश, मी असणारे वेतन इ. असू शकते.

शिक्षकांना त्यांच्या व्यवसायामध्ये सर्वोष्कृष्ट स्तरावरील समाधान मिळते हि विशेष बाब आहे. एकूण नमुना गटापैकी १३८ महिला शिक्षिका या सर्वोष्कृष्ट स्तराने व्यवसायात समाधानी आहेत. त्याचे एकूण ९५.१७ इतके प्रमाण होते याचाच अर्थ असा कि, महिला शिक्षिकांना त्यांच्या कामाचा आनंद प्राप्त होत आहे. विदयार्थ्यांना केलेल्या अध्यापनामुळे त्यांनी जी शैक्षणिक प्रगती साध्य झाल्याचे पाहूण व्यावसायिक समाधानाचा दर्जा सर्वोच्च झाला आहे. विदयार्थ्यांची प्रगती हेच आपली कार्यपावती मानून शिक्षिका सेवा वृत्तीने कार्य करताना दिसून येतात. त्यामुळेच त्याची व्यवसायिक समाधानाची पातळी उच्च नोंदविण्यात आली आहे.

**कोष्टक क्र. ३ महिला शिक्षकंच्या स्व संकल्पना व व्यवसायाची तुलना**

| घटक | मध्यमान | प्रमाण विचलन |
|---|---|---|
| स्वसंकल्पना | २४८.९०३ | १५.९९ |
| व्यवसायिक समाधान | ८३.३५ | ५.४५ |

वरील कोष्टक असे दर्शविते की महिला शिक्षकांच्या स्व संकल्पनाचे मध्यमान हे २४८.९०३ आहे. व त्यांच्या व्यवसायिक समाधानाचे मध्यमान हे ८३.३५ एवढे आहे. या दोन्ही मध्यमानातील फरक २४५.५५३ आहे. स्व संकल्पनाचे प्राप्तांकांचे प्रमाण विचलन हे १५.९९ आणि ५.४५ एवढे आहे. प्रमाण विचलनातील फरक हा १०.५४ आहे. व्यवसायिक समाधान व स्व संकल्पना यांचा जवळचा संबंध आहे.

**निष्कर्ष:-**

प्राथमिक शिक्षिकांनी विदयादानाच्या कामात मोलाचे योगदान दिलेले आहे. त्या पुरूषाच्या तुलनेत समानततेने किंबहुना अधिक प्रमाणात या व्यावसायिक क्षेत्रात समावष्टि झालेल्या आहेत. स्वसंकल्पना स्त्रीयांमध्ये मुळधरत असतानाच प्राथमिक महिलांमध्ये त्याचे प्रमाण समाधानकारतेच्या पातळीवर उच्चतम आहे. मात्र उत्कृष्टता व अतिनिम्न या दोन्ही टोकाक्कडे समानतेने वितरित होताना दिसून येते. व्यावयायिक समाधान हा व्यवसायाच्या वृध्दीवर अवलंबून असतो. महला शिक्षिकांनी त्यांना निवडलेल्या व्यवसायावर पूर्णतः समाधान व्यक्त

केलेले आहे. सर्व सर्व महिला शिक्षिकांचे प्रतिसाद हे समाधान पातळीसह वरच्या अतिसमाधानकारक व सर्वोष्कृष्ट गटात नोंदविले गेले आहेत. जरी स्व संकल्पना कमी अधिक असली तरी मात्र व्यवसायिक समाधानामुळे महिलांशी या व्यवयांची निवड मोठ्या प्रमाणात केली आहे.

## संदर्भ


Bradley R. Brenner (२००३), A study of Self Awareness, self- efficacy and sojourners adjustment over time, unpublished Ph. D. Thesis, University of Maryland.

Carolyn Medel Anonuevo (१९९३), Edit, Woman Education and Empowerment: Pathways towards Autonomy, Report of the International seminar held at UIE, Hamburg.

Garrett, H. E. (१९८१), Statistics in Psychology and Education, Woodworth R. S. Vakils, Feffer and Simons Ltd. Bombay, Pp. ४६१.

Naresh Rout (२०१६), Role of woman in Ancient India, Odisha Reviews, odisha.gov.in., Pp ४३-४८.

Powell K.C. (२००९), The Role of Concept of self and societal expectations in Academic and career Achievement, Journal of Adult Education, Vol - ३८, Pp - ३२- ४०.

Viktor Gecas (२०११), The Self Concept, Annual Review of Sociology, Vol- ८, Pp १- ३३.